साप्ताहिक
भारत सरकार मान्यताप्राप्त
# अनंत विचार
संपादक : सचिन हरी आदापुरे     मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल   युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com
अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.२६ मार्च २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३४ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## नदीकाठच्या गावांचा वीजपुरवठा आज सायंकाळपासून सुरळीत होणार- आ. समाधान आवताडे

**मंगळवेढा नवमित्र न्यूज:-**

उजनी धरणातून सध्या पिण्यासाठी भीमा नदीमध्ये पाणी सोडण्यात आले असून पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचेपर्यंत नदीकाठच्या गावचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता हे पाणी सध्या हिळळी बंधाऱ्यात पोहोचले असून तात्काळ वीज पुरवठा पूर्ववत करावा अशी सूचना आमदार समाधान आवताडे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिल्यानंतर कुमार आशीर्वाद यांनी आज सायंकाळपासून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येणार असल्याची माहिती आम



दार समाधान आवताडे यांनी सांगितले.

सध्या नदीत पाणी असूनही वीज पुरवठा खंडित केल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नव्हते,शेतात असलेली उभी पिके डोळ्यासमोर वीज नसल्याने जळून चालली होती,केवळ दोनच तास वीज पुरवठा सुरू असल्यामुळे शेतात पाणी येण्याअगोदर वीज बंद होत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत होते,त्यामुळे नदीकाठचे शेतकरी वीज पुरवठा सुरळीत करण्या संदर्भात वारंवार मागणी करत होते त्यानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना बोलून वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्यामुळे आज सोमवारी सायंकाळपासून वीजपुरवठा सुरळीत होणार असल्याचे आ समाधान आवताडे यांनी सांगितले.

## गर्भगृहातील काम वेळेत पूर्ण करावे

### सहअध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सूचना



पंढरपूर - श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे व जिर्णोद्वाराचे काम पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. त्यामध्ये श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेच्या गाभा-यातील संवर्धनाचे काम आषाढी यात्रेपूर्वी करण्याचे प्रस्तावित असून, गर्भगृहातील काम पुरातत्व विभागाने व संबधित ठेकेदाराने वेळेत पूर्ण करावे अशा सुचना मंदीर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिल्या.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे काम सुरू असून या कामांची पाहणी मंदिर समितीचे सदस्य व पुरातत्व विभागाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे पाहणी केली. तसेच मंदिर समिती सदस्य, पुरातत्व विभाग व संबधित ठेकेदार यांच्या समवेत सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी मंदीर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड.माधवी निगडे तसेच दुरदुष्य प्रणालीद्वारे श्री. अतुलशास्त्री भगरे गुरूजी, कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र शेळके, व्यवस्थापक श्री बालाजी पुदलवाड, पुरातत्व् विभागाचे सहायक संचालक श्री विलास वाहणे, वास्तुविशारद श्रीमती तेजस्विनी आफळे, बांधकाम विभाग प्रमुख श्री बलभिम पावले, ठेकेदार श्री रमेश यवले उपस्थित होते. यावेळी मंदिर संवर्धन व जिर्णोद्वार आराखड्यातील प्रस्तावित कामांपैकी बाजीराव पडसाळी, गर्भगृह, सोळखांबी, सभामंडप व इतर ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यात आली.

## माढ्यात भाजपने दिलेला उमेदवार बदलण्यासाठी शिवसेनेचाही दबाव

**पंढरपूर** - माढा लोकसभा मतदारसंघात भाजपने पुन्हा संधी दिलेले विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या उमेदवारीला ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या कुटुंबीयांपाठोपाठ आता महायुतीचा प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेना एकनाथ शिंदे गटानेही तीव्र विरोध केला आहे. पक्षाचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी पक्षाच्या मेळाव्यात उमेदवार बदलण्याची मागणी केली आहे.

कुर्डूवाडी येथे आयोजितशिवसेनामेळाव्यात प्रा. शिवाजी सावंत बोलत होते. त्यांनी यावेळी बोलताना भाजपचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या कार्यपद्धतीवर कडाडून टीका केली. मागील वर्षात त्यांनी मित्र पक्ष म्हणून शिवसेनेलाच नव्हे तर सामान्य जनतेला गृहीतच धरले



नाही.असा उमेदवार पुन्हा लादण्यात येऊ नये. अजून वेळ गेली नाही. आपण महायुतीचेच प्रामाणिकपणे काम करणार असून फक्त निंबाळकर यांची उमेदवारी बदलावी अशी मागणी प्रा. सावंत यांनी केली.

खा.रणजितसिंह निंबाळकर यांनी पुढील पाच वर्षांसाठी शिवसेनेने सांगितलेली सर्व समाजहिताची कामे करण्याची हमी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या समक्ष द्यावी. त्याप्रमाणे मुख्यमंत्री शिंदे यांनी निंबाळकर यांच्याकडून हमी घ्यावी आणि आम्हाला आदेश दिल्यास आम्ही निंबाळकर यांचा प्रचार करू, अशी अट प्रा. सावंत यांनी घातली आहे. यावेळी भाजपचे माढा तालुक्यातील नेते, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचे माजी सभापती, माजी सभागृहनेते शिवाजी कांबळे यांनी खासदार निंबाळकर यांच्यासह माढ्याचे राष्ट्रवादीअजित पवारगटाचे आमदार बबनराव शिंदे यांच्यावर चौफेर टीका केली. माढ्यात भाजपने रणजितसिंह निंबाळकर यांना पुन्हा दुसऱ्यांदा उमेदवारी दिल्यामुळे संतप्त झालेले शिवसेना माढा विभाग संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांनी अलिकडेच थेट पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्यांचीही भावना हीच असल्याचे प्रा. सावंत यांनी सांगितले.

## माढ्यातून मीही निवडणूक लढविण्याची तयारी केली होती : प्रशांत परिचारक

**पंढरपूर** - माढा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची ऑफर मला काही नेत्यांनी दिली होती. त्या दृष्टीने मी तयारीही केली होती.



मात्र, भारतीय जनता पक्षाकडून कोणतीही सूचना आली नाही. त्यामुळे मीही पक्षाकडे उमेदवारीही मागितली नाही अशी माहिती माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

माढा लोकसभा मतदारसंघात उमेदवारीवरून महायुतीमध्ये पेच निर्माण झाल्यानंतर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, माढ्याचे आमदार बबनराव शिंदे, आमदार संजय शिंदे यांनी मला लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी ऑफर केली होती. त्यामुळे माढ्यातून निवडणूक लढविण्यासाठी मी इच्छूक होतो. तशी तयारीही मी केली होती. मात्र, पक्षाकडून कोणतेही निर्देश मला लोकसभा निवडणुकीसंदर्भात देण्यात आले नाहीत आणि मीही पक्षाकडे लोकसभा उमेदवारीची मागणी केली नाही, असे स्पष्टीकरण माढा लोकसभा मतदारसंघाचे प्रभारी, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिले.

भारतीय जनता पक्षाने सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात उमेदवार निवडण्यासाठी अत्यंत मायक्रो प्लॅनिंग केले आहे. त्यातूनच माढ्यातून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघाठी चाचपणी सुरू आहे, असेही परिचारक यांनी स्पष्ट केले.पंढरपूर-मंगळवेढा पोटनिवडणुकीसाठीही मी इच्छुक होतो; परंतु त्या वेळी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने आपल्याला थांबण्याची सूचना केली होती. त्यानंतर आपण पोटनिवडणुकीसाठी थांबलो होतो, याची आठवणही परिचारक यांनी पुन्हा करून दिली आहे. मात्र, लोकसभेच्या दृष्टीने पक्षाने आपल्याला कोणतीही सूचना केलेली नाही.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारीला मोहिते पाटील यांनी कडाडून विरोध केला आहे. त्यातच परिचारक यांनीही आपण इच्छूक होतो, हे स्पष्ट केले आहे.

**सोलापूर व माढ्यातुन भाजपचे उमेदवार विजय होतील- परिचारक**

मोदी सरकारची विकासाची धोरणे आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या योजना यामुळे सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करून माजी आ. परिचारक म्हणाले, खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनीही अनेक विकास कामे केली आहेत. त्यामुळे पक्षश्रेष्ठींकडून पुन्हा उमेदवारी दिली आहे, तसेच मतदारही त्यांच्या कामावर खूश आहेत, त्यामुळे खासदार निंबाळकर यांचा विजय निश्चित असल्याचे परिचारकांनी सांगितले.

## पंढरपूर येथे होळी ते रंगपंचमी कालावधीत लावण्या महोत्सव

पंढरपूर प्रतिनिधी- पंढरपूर येथे होळी ते रंगपंचमी या काळात शेकडो वर्षांची परंपरा असणारा बैठकीची लावणी हा कार्यक्रम रविवार, २४ मार्च ते शनिवार, ३० मार्च या कालावधीत जुनी माळी गल्ली येथील श्री एकनाथ भवन येथे रात्री साडेआठ ते १०:३० या कालावधीत होणार आहे.

उत्पात समाजातील मनोहर ऊर्फ छबू काका उत्पात, श्याम ऊर्फ विनय उत्पात, अनिल उत्पात, प्रसाद उत्पात ही मंडळी बैठकीच्या लावण्या सादर करणार आहेत. गेली अनेक वर्षे ज्ञानोबा ऊर्फ माऊली उत्पात या लावण्या सादर करीत असत, मंगळवार, २६ मार्च रोजी मोडनिंब येथिल महिला कलावंत आपली कला सादर करणार आहेत. नंदा-उमा इस्लामपूरकर, राष्ट्रीय युवा रत्न पुरस्कार प्राप्त प्रमिला लोदगेकर, प्रेमा घाटणेकर या प्राप्त्यां कला सादर करणार आहेत.लावणी म्हणजे मराठी शारदेच्या पायातील चाळ आहेत.




शाहिरानी डफावर थाप मारून मर्दानी पोवाडे रचले. लावणीचा हाच वारसा कै. ज्ञानोबा उत्पात, वा. म. उत्पात, बी.डी. उत्पात या मंडळीनी जोपासला व वाढविला. ज्ञानोचा उत्पात यांनी उत्पात गल्लीतील लावणी दिल्ली पर्यंत गाजवली.

होळी पौर्णिमा ते रंगपंचमी या काळात दिवसा मिष्टान्न भोजन व रात्री लावणी आजही चालू आहे. पेशवाईमध्ये शाहिरी लावण्या जास्त प्रमाणात गायल्या जात असत. महाराष्ट्रात तर सर्वदूर लावणी कार्यक्रम होत असत. परंतु जुन्या मराठी लावणीचे वेड पंढरपुरातील उत्पात मंडळीना पूर्वी पासूनच आहे ते आजही टिकून आहे. वै. दादबा उत्पात, वै. ज्ञानेश्वर गोपाळ उत्पात पूर्वी लावणी गायन होळी पोर्णिमा ते रंगपंचमी पर्यंत ते बंदिस्त खोलीत स्वांतुखाय गात असत.

सुरुवातीला डफाच्या साथीने लावणी गायन चालत असे परंतु पुढे मृदंगाचार्य कै. शंकरअप्पा मंगळवेढेकर तबला साथ करू लागले आणि डफाच्या तालावरची लावणी खऱ्या अर्थाने खुलू लागली.

लावण्यांच्या रचना भडक श्रृंगारिक जरी असल्या तरी बिभत्स नाहीत. दर्जेदार आहेत. म्हणून पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे यांनी जेव्हा या लावण्या ज्ञानोबा उत्पातांकडून ऐकल्यावर ते खूपच प्रभावीत झाले आणि उत्पात वाड्यातील लावणी खऱ्या अर्थाने बाहेर आणली. तो लावणी मंडळाचा सुवर्णकाळ होता. दुर्गा भागवत, पं. भीमसेन जोशी, छोटागंधर्व, कुमारगंधर्व, जितेंद्र अभिषेकी, बाबूजी या सारख्या दिग्गजांनी ज्ञानोबा उत्पातांच्या लावणी संपूर्ण कार्यक्रमास थांबले व कार्यक्रमानंतर ते म्हणाले, उत्पात तुमची लावणी नाही, मूलावणी आहे. अशा या उत्पात लावणीचा वारसा पंढरपुरात आजही चालू आहे. जुन्या मराठी लावणीच्या रचना, चाली अवगत असणारी उत्पात मंडळी हा कार्यक्रम होळी ते रंगपंचमी पर्यंत करतात.

# संपादकीय

## निवडणूक निकालाच्या दिवसांपूर्वी दोन-तीन महिने बाजारात अस्थिरता असते.

सन २०२४ हे भारतातील सार्वत्रिक निवडणुकांचे वर्ष आहे. १५ मार्चला निवडणूक तारखा जाहीर झाल्या आहेत. सध्या अस्तित्वात असलेले सरकारच पुन्हा सत्तेवर येईल आणि अधिक जोमाने आर्थिक कार्यक्रम पुढे नेईल यावर सर्वसाधारण एकमत आहे. सर्व जगावर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष वर्चस्व गाजवणाऱ्या अमेरिकेतही या वर्षअखेर निवडणूक होत आहेत. त्यामुळे या वर्षी पहिल्या सहामाहीत भारतातील निवडणूक आणि दुसऱ्या सहामाहीत अमेरिकेतील निवडणूक हे दोन मोठे कार्यक्रम या वर्षभरात आहेत. तेथे परिवर्तन अपेक्षित असून जर तसे झाले, तर विद्यमान अध्यक्ष त्यांनी घेतलेल्या धोरणांमुळे टीकेचे लक्ष्य आहेत आणि त्याचा फायदा विरोधक उठवत आहेत असे चित्र असून यापूर्वीही राष्ट्रवादाचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी एक निवडणूक जिंकली होती. त्यामुळे जर परिवर्तन झाले तर त्यामुळे जगावर काय परिणाम होईल यानिमित्ताने विविध वृत्तपत्रांतून काही मंथन सुरू आहे. अमेरिका हा लौकिक भांडवलवादी देश असल्याने राष्ट्रवादाचा त्यावर काय परिणाम होईल यावर मतमतांतरे आहेत म्हणून एकूण सार्वत्रिक निवडणुकांचा चिंतानात्मक आढावा घेण्याचा हा प्रयत्न. भारत हा मोठा लोकशाही असलेला देश असून सन १९९९ पासूनचा २५ वर्षांचा इतिहास तपासता निवडणूक निकाल काहीही असो. त्या दिवसांपूर्वी दोन-तीन महिने बाजारात अस्थिरता असते. महिनाभर आधी बाजारात उलटसुलट बातम्यांनी नकारात्मकता येते. हे सर्वसाधारण अपेक्षित आहे याचे मुख्य कारण असे की, निवडणुकीनंतर सरकारी धोरणात फरक पडतो का? आर्थिक धोरणात काही फरक पडेल का? लोकांची मानसिकता बदलेल का? यावर साशंकता निर्माण व्हावी असे वाद घातले जातात. त्यात राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांची भाषणे, राजकीय विश्लेषकांची मते, मतदानपूर्व आणि मतदान पश्चात व्यक्त केलेले अंदाज यामुळे सरकार कोणते येईल? त्याचे गुंतवणूक धोरण काय असेल? त्याचा वेगवेगळ्या क्षेत्रातील कंपन्यांवर काय परिणाम होईल? याबाबत साशंकता निर्माण होण्यास मदत होत असल्याने बाजारातील अस्थिरता वाढते. ही निवडणूक तुमच्या दृष्टीने कशी महत्त्वाची आहे त्यासाठी तुम्ही काय केलं पाहिजे यासारखी मतदारांना एकत्र येण्यास आवाहन करणारी किंवा आता नाही तर कधीच नाही अशा पद्धतीने त्यास विरोध करणारी विरोधकांची वक्तव्ये यामुळे संभ्रम निर्माण होतो. शेअर बाजारात नोंदवलेल्या कोणत्याही कंपनीच्या दृष्टीने त्यांनी केलेली प्रगती हाच त्याचे भाव अंतिमतः वाढण्यास कमी होण्यात किंवा स्थिर होण्यात मदत करतात. विविध बातम्या, अफवा यामुळे पडणारा फरक हा तात्पुरता असतो. भावात पडणारा फरक, मागणीत होणारे बदल, विविध बातम्या, त्यामुळे होणारे परिमाण याची बाजार नियामक मंडळ दखल घेत असते. त्याप्रमाणे वेळोवेळी आवश्यक बदल केले जातात आणि त्यांची माहिती वेळोवेळी भांडवल बाजार नियमकांना दिली जाते. काही वेळा नियामक स्वतः त्यात हस्तक्षेप करतात. यापूर्वी सिंडिकेट करून भावात कृत्रिमरीत्या तेजी मंदी केली जात होती हे प्रकार आता बऱ्यापैकी नियंत्रणात आहेत. सरकारी धेय्यधोरणे विरोधात गेल्यास त्या संबंधित कंपनीच्या कामकाजावर निश्चित परिणाम होऊ शकतो. त्यामुळेच देशी विदेशी गुंतवणूकदार सावध पावित्र्यात असतात. आपली अर्थव्यवस्था बळकट व्हावी या हेतूने आपण परदेशी गुंतवणूकदारांना थेट किंवा अप्रत्यक्ष अनेक सवलती दिल्या आहेत. ते व्यवसाय करण्यासाठी आले असल्याने भारतातील घडामोडींवर लक्ष ठेवून असतात. त्याप्रमाणे भारतीय बाजारातून आपला नफा वेळोवेळी काढून घेत असतात. जर हा व्यवहार फायदेशीर नाही असे त्यांना वाटले तर ते ही गुंतवणूक कधीही काढून घेऊ शकतात. मागील कालावधीत बहुमत असलेले स्थिर सरकार, काठावर बहुमत त्यामुळे अन्य पक्षांचा पाठिंबा असलेले सरकार, अल्प बहुमत आणि त्याला बाहेरून पाठिंबा असलेले सरकार अशी अनेक स्थित्यंतरे होऊन गेली १० वर्षे स्थिर सरकार मिळाले आहे. अशी अनेक स्थित्यंतरे झाली तरी सरकारच्या प्राथमिक धोरणात मोठा फरक पडला नाही. त्यामुळे सत्ताधारी विरोधक झाले आणि विरोधक सत्ताधारी झाले तरीही त्यानंतर बाजार सकारात्मक परतावा दिला आहे. आजपर्यंतच्या इतिहासात याला छेद देण्याचा आणि या धोरणाच्या विरुद्ध धोरण जाहीर करणाऱ्या सरकारचा पाठिंबा काढून घेतल्याने लेखानुदान मंजूर न होण्याचा मोठा पेचप्रसंग एकदा उद्भवला होता तेव्हा तत्कालीन राष्ट्रपतींनी त्यात मध्यस्ती करून त्यातून मार्ग काढला. मध्यावधी निवडणुकीनंतर बँकिंग, कंझ्युमर ड्युरेबल्स, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र ही क्षेत्रं नेहमीच पहिल्या पाच क्षेत्रात राहिली आहेत. सन १९९९चे निवडणूक निकाल हे ऑक्टोबरमध्ये आले त्यावेळी बाजार खाली येऊन ऋण परतावा मिळाला. त्या आधीचा ६ महिन्यांचा परतावा त्यानंतरच्या ४ निवडणुकांचे निकाल मे अखेरीस आले. बाकी सर्व प्रसंगी निवडणुकीपूर्वी बाजारात अस्थिरता वाढली होती.

## आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सीव्हिजिल ॲपवर तक्रार करा

### पहिल्या १०० मिनिटाच्या आत मिळतो प्रतिसाद, भारत निवडणूक आयोगाने विकसित केला मोबाईल ॲप

मुंबई, दि. २१ : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन प विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल प विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

हा सीव्हिजिल प अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त प उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. प वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

वैशिष्ट्य

सीव्हिजिल प हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहिताच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

वापर कसा करायचा

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या पमध्ये जावून सीव्हिजिल (लतखत्रऋखङ) सर्च करावे.त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

अचूक कृती व देखरेख

या प्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल प जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

लाईव्ह फोटो, व्हिडिओ

या पच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हिडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

तातडीने होते कारवाई

या पवर तक्रार दाखल होताच भारत निवडणूक आयोग तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कार्रवाई करेल.

डाटा सुरक्षा

या पवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

## श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदिर शाळेत पर्यावरण पूरक होळी साजरी



पंढरपूर :- श्री रुक्मिणी विद्यापीठाच्या संस्थापिका मा. सौ सुनेत्राताई पवार सो.यांच्या मार्गदर्शनाखाली श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदिर पंढरपूर शाळेत पर्यावरण पूरक होळी साजरी करण्यात आली.

मुलांनी शालेय परिसरातील केरकचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला व त्या कचऱ्यापासून पर्यावरण पूरक होळी केली. पाणी बचतीचे, पर्यावरण रक्षणाच्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी होळीस फेऱ्या घेतल्या. इयत्ता ४थी चे विध्यार्थी चि. आयन, अर्णव, श्लोक,आरोही व तेजस्विनी यांनी पाणी बचतीचे व पर्यावरणाची रक्षणाची माहिती सांगून पर्यावरण रक्षण व पाणी बचतीची शपथ दिली.

होळीचे पूजन मुख्याध्यापक श्री संतोष कवडे सर यांनी केले. या पर्यावरण पूरक होळीसाठी सौ.कदम मॅडम,यादव मॅडम व टापरे सर आगावणे सर साळुंखे सर, मुजावर सर व महेश भोसले सर यांनी परिश्रम घेतले.

## अंतर्ज्ञान आणि विश्वास

**सरश्री**



हे दोन गुण जोवर प्रकट होत नाहीत, तोवर त्याला अंतर्यामी अपूर्णता आणि कमतरता जाणवत राहते. उदाहरण द्यायचं झालं तर, जोवर एखादा सिनेमा रिलीज होत नाही, तोवर त्या सिनेमातील कलाकार आणि दिग्दर्शक संतुष्ट नसतात. अगदी त्याचप्रमाणे तुमच्या अंतरंगात दडलेले हे दोन गुण जोवर पूर्णपणे प्रकट होत नाहीत, तोवर तुम्हाला अपूर्णता जाणवत राहते.

हे दोन गुण आहेत तरी कोणते? ते म्हणजे - विश्वास आणि प्रेम! तुमच्या जीवनात विश्वास प्रकट झाला नाही, तर तुम्हाला कोणत्याही प्रकारचा आनंद प्राप्त होत नाही. शिवाय, जोवर प्रेम पूर्णतः प्रकट होत नाही, तोवर तुमच्या हृदयात कोणतीही सुखद भावना निर्माण होत नाही. विश्वासानं प्रेम जागृत होतं आणि प्रेमानं विश्वास जिंकता येतो. अशाप्रकारे हे दोन्ही गुण परस्परांना पूरक आणि साहाय्यकारी असतात. परमेश्वरावरील विश्वास माणसाच्या मनात भक्ती जागृत करतो; मग ही भक्तीच मनातला अढळ विश्वास वृद्धिंगत होण्यासाठी कारणीभूत ठरते.

लोक काही विशिष्ट स्थानी जाऊन, आजारांपासून मुक्ती मिळवतात. मग ते स्थान एखाद्या डोंगरावर असो, मंदिर असो, चर्च असो, दर्गा असो, गुरुद्वारा असो किंवा एखादं जंगल... माणसामध्ये असणारा विश्वास प्रकट करण्यासाठी ते स्थान अतिशय साहाय्यक ठरतं. या स्थानांवर गेल्याने लोकांचे नवस पूर्ण होतात, त्यामागचं मुख्य कारण म्हणजे विश्वास! विश्वास म्हणजे विश्वातील सर्वाधिक शक्तिशाली तरंग होय. या तरंगाच्या सान्निध्यात आल्यावर माणसाचं तन-मन खुलतं, प्रसन्नतेच्या भावनेनं उमलू लागतं. परिणामी भय आणि चिंतेचे नकारात्मक तरंग नष्ट

**तेजज्ञान फाउंडेशन**
**9921008060**
**helpdesk@tejgyan.org**

## कोळेकर महास्वामीच्या नूतन मठाचे व सभागृहाचे दिघंची येथे उद्घाटन

नाझरे - रुद्र पशुपती कोळेकर महास्वामीजी यांच्या कृपाशीर्वादाने दिघंची तालुका आटपाडी येथे महास्वामीच्या मठाचे, सभागृहाचे व व्यापारी संकुलाचे बुधवार २७ मार्च रोजी कोळेकर महास्वामींच्या अमृत हस्ते उद्घाटन सोहळ्याचे आयोजन केले असल्याचे वीरशैव लिंगायत समाज दिघंची व मठ संस्थान तर्फे सांगण्यात आले.

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

## माढा मतदार संघ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा राहणार इच्छुक उमेदवार अभयसिंह जगताप यांची भूमिका



**पंढरपूर** - माढा मतदारसंघात शिवसेना राष्ट्रवादी विभागल्याने म हायुतीच्या आमदारांची आणि कार्यकर्त्यांची संख्या पाहता. निवडणूक लढवण्यासाठी कोणीही पुढे येण्याची शक्यता नसताना या मतदारसंघात परिवर्तन करण्यासाठी काम केले आहे. याबाबत मागील काही दिवसापूर्वी सोलापूर आणि सातारा येथील पक्षाच्या जिल्हाध्यक्षांनी अभयसिंह जगताप यांना माढ्याची उमेदवारी द्यावी अशी म ागणी केली आहे. मात्र काही दिवसापासून पक्षाबाहेरील उमेदवारांच्या नावाची चर्चा सुरू असल्याने आमचे कार्यकर्ते संभ्रम अवस्थेत आहेत याबाबत आपण पक्षाचे पदाधिकारी आणि समर्थकांचा मेळावा २८ मार्च २०२४ रोजी म्हसवड येथे मेळावा आयोजित करणार आला असून येथे व्यक्त केलेल्या भावना वरिष्ठ नेते मंडळींपर्यंत पोहोचवणार असल्याचे जगताप यांनी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत सांगितले.

पुढे बोलताना अभयसिंह जगताप म्हणाले की राज्यात भारतीय जनता पार्टीकडून पक्ष फोडण्याचे काम झाले आहे. सरकारमध्ये दुसऱ्या पक्षाचे ताकदवान नेते सामील होत आहेत. मात्र या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झालेले आहेत.

यामुळे राज्यातील जनता भाजपा विरोधात नाराज आहे. राज्यात शरदचंद्र पवार, उद्धव ठाकरे यांच्या बाबत सहानुभूतीची लाट आहे.माढा लोकसभा मतदार संघात आश्वासना व्यतिरिक्त कोणतीही विकास कामे न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.यावरून पक्षातील मतभेद दिसून येत आहेत.महादेव जानकर यांनीही माढ्यातून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त करत असल्याचा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केल्यावरयाबाबत आम्हाला विश्वासात घेऊन पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील अशी अपेक्षा जगताप यांनी व्यक्त केली.भाजपाकडून कोणीही उमेदवार असला तरी माढ्याचा उमेदवार हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा द्यावा. अशी मागणी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेत अभयसिंह जगताप यांनी केली.

## ७०० झाडांचे रक्षितावन वाचवण्यासाठी डॉ.इनामदार यांची १ लाख रुपयांची देणगी



**अकलूज** - माणदेशी दुष्काळी भागातील शिखर शिंगणापूर मुंगीघाटातील ७०० झाडांच्या रक्षितावनाला दुष्काळी परिस्थितीत वाचवण्यासाठी डॉ , एम,के, इनामदार अश्विनी हॉस्पीटल अकलूज यांनी पाण्याची सोय करण्यासाठी ७ के व्ही चा जनसेट, ५ एकर परिसरात लावलेल्या ७०० झाडांना ठिबक सिंचन संच अशी १ लाख रुपयांची देणगी देऊन होळी सणाच्या दिवशी सदर स्थळाची पाहणी करून झाडांना पाणी पोहोच केल्याने शिखर शिंगणापूरच्या माळरानावर अल्पावधीतच वनराई फुलणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे .

माणदेशी सुपुत्र रोहित बनसोडे व म ानदेशी कन्या रक्षिता बनसोडे यांनी कायमच दुष्काळी पट्टा म्हणून संबोधल्या गेलेल्या माणदेशी उजाड माळरानावर २५ हजार वृक्षांचे वृक्षारोपण करून संवर्धनही केल्याने नुकताच त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने वनश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते याच बंधू आणि भगिनींच्या कानावर शिखर शिंगणापूर येथील मुंगी घाटातील उजाड माळरानावर शंभू महादेवाला येणाऱ्या भक्तांची ऐन उन्हाळ्यात अडचण होते ही बाब लक्षात आल्यानंतर या जोड गोळीने मुंगी घाटातील उजाड माळरानावर सन २०२३ च्या पावसाळ्यात वड आणि पिंपळ अशी ५ एकरावर ७०० झाडांची लागवड व संवर्धन केले सन २०२३ मध्ये कमी पर्जन्यमान झाल्याने माळशिरस तालुका दुष्काळी तालुका म्हणून जाहीर करण्यात आला यामुळे मुंगी घाटात लावलेल्या झाडांचे संगोपन करणे कठीण होऊन बसले तरीदेखील न खचता रोहित आणि रक्षिता हे या झाडांचे संवर्धन करण्यासाठी अनेकांना भेटत होती ही झाडे वाचविण्यासाठी प्रयत्न करत होती त्यातच त्यांनी अकलूजच्या अश्विनी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. एम के इनामदार यांचे नाव सुचविण्यात आले तात्काळ त्यांनी निसर्गप्रेमी महादेव जाधव यांच्यासह डॉ.एम के इनामदार यांची भेट घेऊन त्यांना ही झाडे जगविण्यासाठी आपणाकडून मदत व्हावी अशी इच्छा व्यक्त केली लागलीच डॉ. एम के इनामदार हे मुंगी घाटातील झाडे पाहण्यासाठी गेले आणि याच जागेवर डॉक्टरांनी ७ के व्ही चा ५१ हजार रुपयांचा जनसेट आणि ५ एकर ठिबक सिंचन संचासाठी ५० हजार रुपये अशी १ लाख रुपयांची देणगी देऊन होळीच्या सणाचे औचित्य साधून मोटार सुरू करण्यात आली याप्रसंगी डॉ एम के इनामदार व निसर्गप्रेमी ड सचिन राऊत, शहाजी आघाडे , महादेव जाधव , दाम ुअन्ना महाराज आदी उपस्थित होते.

## जळोली परिसरात बिबट्या सदृश्य प्राण्याचा खुलेआमपणे वावर...!

**करकंब** - जळोली ता. पंढरपूर येथील सरपंच ज्योतीराम मदने यांच्या शेतामध्ये बिबट्या सदृश्य प्राणी आढळून आल्याने जळोलीसह परिसरात भीतीचे व घबराटीचे वातावरण पसरले असून या बिबट्याची पुन्हा दहशत निर्माण झाली आहे. असताना वनविभाग मात्र याबाबत अजूनही अनभिज्ञ असून या बिबट्या सदृश्य प्राण्याबाबत बघायच्या भूमिकेत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. यापूर्वी सन २०२० पासून हा बिबट्या सदृश्य प्राणी पंढरपूर तालुक्यात वावरत असून आज पर्यंत या बिबट्याचा वावर जाधव वाडी, पटवर्धन कुरवली पांढरेवाडी, आदि विविध ठिकाणी सुरू असताना वन विभागाचे अधिकारी मात्र अद्याप या बिबट्या सदृश्य प्राण्याचा शोध घेऊ शकले नाहीत. अशीही चर्चा ग्रामस्थातून सुरू आहे. त्यामुळे या भागात लोकांमध्ये भीतीचे व घबराटीचे वातावरण निर्माण झालेले असल्याने वनविभाग अंतर्गत योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही बोलले जात आहे.

## बी.सी.ए. या कोर्सला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता द्यावी लागणार एस.सी.ई.टी. परिक्षा

**पंढरपूर** - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ (academic Years 2024-25) पासून बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम.एस./बी.बी.एम. या (Graduate and Post Graduate Course) अभ्यासक्रम च्या प्रवेशाकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (State Common Entrance Test) कक्षामार्फत सीईटी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याकरीता गुरुवार दिनांक २१ मार्च २०२४ पासून अर्ज नोंदणीला सुरुवात झालेली (-pplication Registration Start) आहे. महा-बी. बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम. एस./बी.बी.एम. (Maha-B. B.C.¬./ B.B.¬./B.M.S./B.B.M.) सीईटी २०२४ सामाईक प्रवेश परीक्षा प्रथमच महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. नोंदणी अर्ज करण्याची अंतिम मुदत ११ एप्रिल २०२४ पर्यंत देण्यात आली आहे.

चालू शैक्षणिक वर्षापासून बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम. एस./बी.बी.एम. हे अभ्यासक्रम ए.आय. सी.टी.ई. ने आपल्या कक्षेत घेतले आहेत.त्यामुळे या अभ्यासक्रमांना सीईटी लागू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्षे २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येते. त्याअनुषंघाने या शैक्षणिक वर्षापासून बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम. एस./बी.बी.एम. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सीईटी देणे बंधनकारक असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना अर्ज करावयाचा आहे त्यांनी सर्वात प्रथम अधिकृत वेबसाइट लर्शीलशश्र.रहरलर्शी. ोस या वेबसाईटला भेट द्यावी. होम पेजवर दिलेले बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम. एस./बी.बी.एम. उएढ टॅब निवडावे. नोंदणी लिंकवर क्लिक करून उमेदवारांना आपली नोंदणी पुर्ण करावी लागेल. महत्त्वाची ओळखपत्रे भरुन फॉर्म पूर्ण करावा आणि कागदपत्रे सबमिट करावीत. आवश्यक ती फी भरल्यानंतर पेमेंट पावती डाउनलोड करून घ्यावी. अधिक माहितीसाठी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला येथे संगणकशास्त्र विभागाला भेट देऊन प्रा.निलेश रसाळ( मो-९८८१४३०३०४) व प्रा.शेख जावेद (मो-७३८७८६७५८५) यांना समक्ष भेटून आपला नोंदणी अर्ज पूर्ण करावा. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांनी केले आहे.

## अन्नछत्रासाठी जर्मनची भांडी भेट




**पंढरपूर** - मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रासाठी मुंबई येथील अमर वाटेगांवकर या दानशुर भाविकाने सुमारे एक लक्ष किंमतीची जर्मन भांडी भेट दिल्याची माहिती व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी दिली.

वाटेगांवकर हे काही दिवसापूर्वी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी अन्नछत्रात भोजन प्रसाद घेतल्यानंतर अन्नछत्रासाठी साहित्य देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी अंदाजे एक लक्ष किमतीची जर्मन पातेले व स्टील ग्लास सेवाभावी तत्वावर मोफत उपलब्ध करून दिले आहेत. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, उपरणे, दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन यथोचित सन्मान करण्यात आला आहे. त्यावेळी वाटेगांवकर यांचे कुटूंबिय, बांधकाम विभाग प्रमुख बलभिम पावले, अन्नछत्र विभाग प्रमुख राजेश पिटले, सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी व इतर कर्मचारी उपस्थित होते. या भाविकाने दिलेल्या साहित्याचा वापर अन्नछत्र येथे भोजन प्रसाद बनविणे तसेच यात्रा कालावधीत दर्शनरांगेत चहा व खिचडी वाटपावेळी वापरण्यात येणार आहे.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती मार्फत भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून श्री. संत तुकाराम भवन येथे दैनंदिन दु.१२.०० ते २.०० व रा.०७.०० ते ९.०० या वेळेत मोफत भोजन उपलब्ध करून देण्यात येते. त्याचा दैनंदिन २५०० ते ३००० भाविक लाभ घेतात. या अन्नछत्रात अन्नधान्य व इतर साहित्य दान करण्याची देखील सोय आहे. तसेच अन्नछत्र सहभाग योजना असून, या योजनेत किमान रू.७,०००/- पासून पूढे रक्कम दिल्यास, इच्छित दिवशी अन्नछत्रात अन्नदान करता येते.

## माढा लोकसभा मतदारसंघात डॉ.अनिकेत देशमुख यांच्या नावाची चर्चा



**सांगोला** - सांगोला तालुका हा शेतकरी काम गार पक्षाचा बाल्लेकिल्ला समजला जातो. कै. आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांनी ५० ते ५५ वर्षाच्या राजकारणात सांगोला तालुक्याच्या बाहेर सोलापूर व सातारा जिल्ह्यात अनेक विकासाची कामे व पिण्याचे व शेतीचे पाणी प्रश्न सोडवण्यासाठी विधानसभेत वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. तसेच अनेक नेते मंडळी यांच्याशी स्नेहपूर्वक व मैत्रीपूर्ण संबंध जोपासल्याम ुळे सोलापूर व सातारा जिल्ह्यातील सर्व पक्षाची नेतेमंडळी व मतदार वर्ग हा नेहमीच कै.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या पाठीशी भक्कम उभा राहिला आहे. प्रत्येक वेळी शेतकरी कामगार पक्षाने घेतलेल्या भूमि केला माढा लोकसभा मतदार संघातील जनतेने सकारात्मक कौल दिलेला आहे. त्यामुळेच ह्या गोष्टीचा धागा पकडून शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी कै.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांचे नातू डॉ.अनिकेत देशमुख यांची उमेदवारी माढा लोकसभेसाठी इंडिया आघाडीकडे मागितलेली आहे. डॉ अनिकेत देशम ुख हे सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला ह्या नामांकित शिक्षण संस्थेचे विद्यमान संचालक असून त्यामाध्यमातून त्यांनी अनेक शैक्षणिक कामे केलेली आहेत. डॉ. अनिकेत देशमुख यांनी वैद्यकीय क्षेत्रात अनेक शस्त्रक्रिया योजनेच्या म ाध्यमातून करून लोकांची सेवा केलेली आहे. सांगोला तालुक्यासह आसपासच्या तालुक्यातील पाणी प्रश्न, दुधाचा प्रश्न, विजेचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सरकारला व प्रशासनाला निवेदन देऊन व त्याचा पाठपुरावा करून तसेच प्रसंगी आंदोलन करून ते प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. डॉ. अनिकेत देशम ुख हे २०१९ ला सांगोला विधानसभेचे शेकापचे उमेदवार होते त्यावेळी त्यांना १ लाखाच्या आसपास मते मिळाली होती व त्यांचा अवघ्या ७६८ मताने निसटता पराभव झाला होता. एकूण सर्व मतदारांचा विचार करता डॉ. अनिकेत देशमुख यांनाच लोकांची पसंती असल्याचे दिसून येत आहे. सध्या भाजप आघाडीला असणारा शेतकऱ्यांचा रोष, मराठा व धनगर समाज्याच्या आरक्षणाचा रोष याचा फायदा इंडिया आघाडीला मिळू शकतो. इंडिया आघाडीला डॉ अनिकेत देशमुख सारखा तरुण, तडफदार व उच्चशिक्षीत चेहरा मिळाला तर डॉ. अनिकेत देशमुख हे विक्रमी मतांने निवडून येऊ शकतात. या सर्व गोष्टीचा विचार करता डॉ. भाई अनिकेत देशमुख यांनाच उमेदवारी द्यावी अशी जनतेतून मागणी होत आहे.

## करकंब येथील वीरभद्र यात्रेस प्रारंभ...!

**करकंब** - करकंब येथील श्री वीरभद्र देवस्थान (धाकटी वेस) यात्रेस आज पासून रविवार (दि. २४) प्रारंभ झाला असून बनगर गल्लीतील श्री वीरभद्रास सकाळी अभिषेक, पूजा आदि विविध धार्मिक कार्यक्रम देवाची पालखी, छबीना सायंकाळी सात वाजता काढण्यात येईल. असे प्रसन्नजीत हत्तरगे यांनी सांगितले.

यानंतर रविवार दिनांक २४ रोजी संध्याकाळी नऊ वाजता मनोरंजनात्मक छाया विरकर कराडकर यांचा लोकनाट्य तम ाशा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक-२५/३/२०२४ रोजी भव्य कुस्त्याचे मैदान धाकटी वेस या ठिकाणी आयोजित करण्यात आले असून सकाळ दुपारी बारा ते तीन कुस्त्या नेमल्या जातील. सदर यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी पंच कमिटीचे अध्यक्ष सतीश माळी, करकंब गावचे नेते प्रा. सतीश देशमुख, महादेव मांजरे, बंडू खापाले, पै.बाळासाहेब घाडगे हनुमंत करळे, मा.ग्रा. सचिन शिंदे, कुमार वाघमारे ,अमर शेटे, पै. रामभाऊ सलगर, राजू काझी परिसरातील परिसरातील सर्व तरुण व मि त्रपरिवार आदि विशेष परिश्रम घेत आहेत.

# निर्माल्य निर्वाणातून नवा उद्योग निर्माण होवू शकतो माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे



पंढरपूर पंढरपूर हे महाराष्ट्रातील पवित्र असे तीर्थक्षेत्र आहे. येथील निर्माल्याचा प्रश्न प्रशासनाला भेडसावत राहतो. निम ल्याची समस्या सोडविण्यासाठी उद्योजक आणि संशोधकांनी पुढे आले पाहिजे. निर्माल्य निवार्णातून एखादा नवा उद्योग निर्माण होवू शकतो. तुळशीवर प्रक्रिया करून त्यातून नवनवीन उत्पादने घेता येवू शकतात. यादृष्टीने संशोधन व्हायला हवे. पंढरपूर ही आध्यात्मिक राजधानी आहेच; मात्र औद्योगिकदृष्ट्या पंढरपूरचा विकास करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट ८ अंतर्गत महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता समिती, उद्योजकता सेल आणि वाणिज्य उद्योजकता कौशल्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडस्ट्री अकॅडमीया मीट (कॅम्पस टू कॉर्पोरेट कनेक्ट) या उपक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, सकाळ समूहाचे अमोल बिरारी, गंधाली दिंडे, समाधान काळे, अमरजीत पाटील, अमर पाटील, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळसाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. डी. के. गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख मान्यवरांचा परिचय डॉ. अमर कांबळे यांनी करून दिला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे पुढे म्हणाले की, ज्ञानाला कोणत्याही मर्यादा नाहीत. शाळा महाविद्यालयातून मिळालेले ज्ञान समाजजीवनात वापरण्याचे कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाले पाहिजे. सर्वांना सोबत घेवून जाण्यात खऱ्या अर्थाने देशाची प्रगती आहे. त्यामुळे शाश्वत विकास होईल. केलेल्या कामाचे दस्तऐवजीकरण आपणास करता आले तर त्याचा पुढील कार्यासाठी चांगला उपयोग होतो. उद्योजकांनी महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. उद्योजक आणि महाविद्यालये यांनी समान कार्यक्रमाची आखणी केली तर युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील.


पॅनल चर्चेच्या सत्राचे प्रास्ताविक व सर्व उद्योजकांचा सत्कार प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी केला. उपस्थित उद्योजकांनी त्यांच्या इंडस्ट्रीजची माहिती दिली. नाशिक, कोल्हापूर, सांगली, हैद्राबाद, पुणे, सोलापूर, अकलूज, मुंबई इत्यादी ठिकाणाहून पन्नासपेक्षा अधिक कंपन्यानी सहभाग घेतला. औषध निर्माण कंपनी, माहिती आणि तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, खत निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग, कापड उद्योग, प्रकाशन संस्था, साखर कारखाना, टूर्स आणि ट्रॅव्हल्स, प्रसिद्धी माध्यमे इत्यादी क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश होता. पॅनल चर्चेच्या सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे होते.

या बैठकीत महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या इंटर्नशिप, हंड्स ऑन अँड ऑन दी जॉब ट्रेनिंग, , रिसर्च प्रोजेक्ट अँड रिसर्च फंडिंग, सामंजस्य करार, प्लेसमेंट, डेप्युटेशन ऑफ फॅकल्टी, स्टुडन्ट फॉर इंडस्ट्री एक्स्पोजर इत्यादीसाठी महाविद्यालयासोबत कार्यरत राहण्याची त्यांनी तत्परता दर्शविली. या चर्चेमध्ये उद्योजकांना आवश्यक असलेल्या बाबींचा अभ्यासक्रमात समावेश कशापद्धतीने असावा. यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

# विठ्ठल मंदिर घेऊ लागलं मोकळा श्वास, रुपडं पालटलं

## मंदिराचं आयुष्य अजून ७०० वर्षांपर्यंत वाढणार





**पंढरपूर** – पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या विकासासाठी सुरु असलेल्या ७३ कोटीच्या आराखड्यातील कामे वेगाने सुरु असून विठ्ठल मंदिराला पुरातन ७०० वर्षापूर्वीचे रूप येऊ लागले आहे. सध्या विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या गर्भगृहातील ग्रॅनाईट फरशी, फ्लोरिंग काढून टाकायचे काम अंतिम टप्प्यात असून संपूर्ण मंदिराला पुरातन काळातील दगडी फ्लोरिंग बसविण्यात येत आहे.

मंदिरातील नंतरच्या काळात बसविण्यात आलेले मार्बल, ग्रॅनाईट आणि याच पद्धतीच्या चकचकीत फारशा काढून टाकण्यात येत असल्याने खऱ्या अर्थाने मंदिरातील पुरातन असणारा दगड आता मोकळा श्वास घेऊ लागला आहे. विठ्ठल गाभाऱ्यात बसवलेल्या या ग्रेनाईटमुळे दगडांचे श्वसन थांबलं होतं. यामुळे गाभाऱ्यात खूप मोठ्या प्रमाणात दमटपणा राहत असल्याने याचा त्रास भाविकांना तर होताच होता, शिवाय देवाच्या मूर्तीवर देखील याचा विपरीत परिणाम जाणवत होता. एबीपी माझाच्या दणक्यानंतर पुरातत्व विभागाने तातडीने या फारशा हटविण्याच्या सूचना दिल्या आणि आता या ७३ कोटीच्या आराखड्यात हे काम पहिल्या टप्प्यात वेगाने सुरु आहे.

सध्या विठ्ठल मंदिरातील सोळखांबी, चौखांबी आणि गाभारा तसेच रुक्मिणी मातेचा गाभारा येथे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरु आहे. या भागात असणारे दगडी खांब पुरातत्व विभाग शास्त्रोक्त पद्धतीने साफ करीत असल्याने या नक्षीदार खांब, छत आणि फ्लोरिंग याचे मूळ दगडी आकर्षक वैभव दिसू लागलं आहे. विठ्ठल मंदिरातील दगडांवर अत्यंत सुंदर नक्षीकाम आता अतिशय आकर्षकरीतीने समोर येऊ लागले असून मंदिरातील जुने दगडी फ्लोरिंग बाहेर येताच शेकडो वर्षांपूर्वी लोकांनी त्यावर लिहिलेला मजकूर दिसू लागला आहे. आता पुरातत्व विभाग हे मजकूर नोंदवण्याचे काम करणार असून मंदिराच्या इतिहासाची मोठी माहिती यामुळे समोर येऊ शकणार आहे.

विठ्ठल मंदिरातील महालक्ष्मी मंदिराचे बरंचसं काम पूर्ण झालं असून आता हे मंदिर त्याच्यामुळे शेकडो वर्षांपूर्वीच्या रूपात दिसू लागलं आहे. त्याशेजारी असणारी बाजीराव पडसाळीचंही काम पूर्ण होत आल्याने यालाही त्याचा पुरातन लूक मिळाला आहे. याच भागात देगलूर आणि कर्नाटकमधून आणलेल्या काळ्या पाषाणात घडवलेलं फ्लोरिंग बसविण्याचं काम सुरु आहे. विठ्ठल सभामंडपातील पेशवेकालीन भव्य सागवानी लाकडी सभामंडपालाही पॉलिश करायचे काम पुरातत्व विभाग करीत असून यामुळे मंदिराची शोभा वाढू लागली आहे. इतर दगडी बांधकामाची डागडूजी आणि पॉलिशिंग करण्याचं काम सुरू आहे. यातून मंदिरातील पुरातन वास्तुशिल्पाचे आयुर्मान किमान पुढील पाचशे ते सातशे वर्षांनी वाढणार असल्याचे पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे यांनी सांगितले. हे मंदिर अतिशय पुरातन असून

# पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष देण्याची गरज – डॉ अर्जुन भोसले.





करकंब – शाळा,कॉलेज मधील अल्पवयीन मुले मोटारसायकल वरून शाळेत येत असतात त्यांना पालकांनी म ोटारसायकल देऊ नये अथवा त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.सध्या रस्ते अपघाताचे प्रमाण वाढत आहे.आपल्या जीवाचे भान आपणच ठेऊन स्वतःच्या शरीराचे न भरून येणारे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन वाहने सावकाश चालविणे गरजेचे आल्याचे मत यावेळी बोलताना डॉ भोसले यांनी व्यक्त केले.

करकंब येथे अपघात विरोधी जनजागृती कार्यक्रम व मृत्युजय दूत यांचा सन्मान कार्यक्रम प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर डॉ अर्जुन भोसले हे बोलत होते.यावेळी प्रभारी अधिकारी पंढरपूर तालुका पोलिस स्टेशन शुभम कुमार,सपोनि सागर कुंजीर, पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड, आरटीओ च्या अमृता देशम ुख,डॉ पांडुरंग जगताप,उपसरपंच आदिनाथ देशमुख, उद्योजक अमोल शेळके,सुनीता देशपांडे,पोलिस पाटील नाना शिंदे तसेच सर्व पोलिस अधिकारी व कर्मचारी, सर्व गावचे पोलिस पाटील,मृत्युंजय दूत, पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते,ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले की,वाहनचालकांनी वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेऊन वाहतुकीचे नियम पाळणे गरजेचे आहे तसेच हेल्मेट वापरणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी करकंब व परिसरातील रात्री–अपरात्री अपघातात मदत केलेल्या मृत्युंजय दूतांचा सन्मानपत्र देऊन म ान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाने सूत्रसंचालन नेमतवाडीचे पोलिस पाटील विशाल अमराळे तर आभार पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड यांनी मानले.

# अभिजीत पाटलांचे माढ्यातून निवडणूक लढवण्याचे संकेत

## आमदार बबनराव शिंदे यांच्यावर केली टीका



**पंढरपूर** – माझी लढायची तयारी कोठूनही आहे. मी माढ्यात आताही येणार आणि परत सहा महिन्यानेही येणार असं वक्तव्य राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते अभिजीत पाटील यांनी केलं आहे. एका कार्यक्रमानिमित्त ते माढा तालुक्यातील उंदरगावात आले होते. यावेळी त्यांना काही कार्यकर्त्यांनी माढा विधानसभा निवडणूक लढवावी अशी म ागणी केली. यावेळी मी कोठूनही लढायला तयार असल्याचे पाटील म्हणाले. त्यामुळे अभिजीत पाटील हे माढा विधानसभेची निवडणूक लढवणार का? अशी चर्चा सुरु झाली आहे.

माढ्यात चांगल्या शिक्षणाच्या, आरोग्याच्या सुविधा नाहीत. अनेक ठिकाणी चांगले रस्ते नाहीत मग विकास कुठे झाला असे म्हणत पाटील यांनी माढ्याचे आ. बबनदादा शिंदे यांचे नाव न घेता टीका केली. तुमच्या मनातील गोष्ट करण्यासाठी लवकरच येऊ असे म्हणत माढा विधानसभा लढवण्याचे संकेत अभिज पाटलांनी दिले आहेत. दरम्यान, तुम्ही घाबरु नका तुम्हाला उसाला कोणाच्याही दारात जाऊ देणार नाही. तुमचा सगळा ऊस विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला नेला जाईल असे पाटील म्हणाले. विठ्ठल कारखान्यावर ६०० कोटी रुपयांचं कर्ज असतानाही मी चांगला दर दिला. मग जे कारखाने नफ्यात आहेत, त्यांना दर द्यायला काय अडचण? असे सवालही पाटील यांनी केले.

अनेकजण सांगतात की उजनी धरणाचे पाणी सीना नदीला माझ्यामुळं आलं. पण त्यांना पाणी कोणी दिलं? त्या पाण्याचा उगम कोठून झाला असं म्हणत अभिजीत पाटील यांनी आमदार बबनदादा शिंदे यांना टोला लगावला. उजनी धरणाच्या कामात आजही शरद पवार यांचेच नाव घेतले जाते. युतीच्या काळात या कामाला मंजुरी मिळाली होती. उजनी धरणाच्या कामाची कुदळ यशवंतराव चव्हाण यांनी मारली होती. त्यांना विसरणे चुकीचं असल्याचे अभिजीत पाटील म्हणाले.

साखर कारखाना कधीपर्यंत चालतो हे देखील काही लोकांना माहीत नाही. ते लोक अपघाताने राजकारणात पुढे आले आहेत. आम्ही ट्रॅक्टरला उट्या लावून पुढे आलो आहोत असे म्हणत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते अभिजीत पाटील यांनी माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांच्यावर नाव न घेता टीका केली. मागील वर्षी काही लोक म्हणाले अभिजीत पाटील चेअरमन असलेला विठ्ठल सहकारी साखर कारखाना मार्च महिन्यापर्यंत चालत नाही. पण विठ्ठल कारखाना म ार्चपर्यंत सुरु राहिल्याचे पाटील म्हणाले. २००७ साली ज्या साखर कारखान्याला माझी एक टोळी होती, आज मी त्याच साखर कारखान्याचा चेअरमन असल्याचे पाटील म्हणाले.

आज मी सहा साखर कारखाने चालवत आहे. एवढे साखर कारखाने चालवत आहे म्हणल्यावर आडवे अनेकजण येणार असल्याचे अभिजीत पाटील म्हणाले. पाच वर्षात मी पाच कारखाने उभा केले आहेत. त्यामुळं अनेकजण आडवे येणार आहेत. माझ्याम ागे ईडी लावली, पण उद्योग मोठा आहे, त्यामुळं मी देखील हिशोब ठेवल्याचे अभिजीत पाटील म्हणाले. मी चुकीचं काही केलं नाही तर त्यामुळं घाबरायचे कारण नसल्याचे पाटील म्हणाले.



# पंढरपूर अधिवक्ता संघ तर्फे पंढरपूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा

**पंढरपूर** – पंढरपूर अधिवक्ता संघातर्फे दिनांक २३ मार्च रोजी शहा लॉन्स येथे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन करण्यात आलेले होते. सदर संमेलनामध्ये पंढरपूर ,सांगोला व मंगळवेढा येथील अनेक विधीज्ञ यांनी सहभाग नोंदविला होता. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर मा.सलमान आझमी साहेब यांचे शुभ हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व सत्र न्यायाधीश पंढरपूर एम बी लंबे साहेब ,बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे माजी चेअरमन मिलिंद थोबडे साहेब ,दिवाणी न्यायाधीश पाखले मॅडम, खंडाळे साहेब, बुद्रुक साहेब, कामत साहेब ,बागुल साहेब, पठाडे मॅडम, सोनवलकर साहेब, साळुंखे मॅडम तसेच मंगळवेढा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. उल्हास माने साहेब हजर होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंढरपुर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. अर्जुन पाटील यांनी केले.सूत्रसंचालन ड नेत्रजा पाटील मॅडम ,सचिव ड. राहुल बोडके व सहसचिव शक्ती माने यांनी केले. सदर कार्यक्रमाचा विधीज्ञा मध्ये उत्साह दिसून आला.कार्यक्रमाचे आभार उपाध्यक्ष ड. शशिकांत घाडगे यांनी केले.